दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

● वर्ष १६ वे ● अंक १९६ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● सोमवार दि.११ ऑक्टोबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com


दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

# महाराष्ट्र अंधारात जाण्याची भिती

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**कोळशाच्या टंचाईमुळे महावितरणला वीजपुरवठा करणाऱ्या विविध औष्णिक वीजनिर्मिती केंद्रांतील १३ संच सद्यस्थितीत बंद पडले आहेत. त्यामुळे तब्बल ३३३० मेगावॅट विजेचा पुरवठा ठप्प पडला आहे. विजेची ही तूट भरून काढण्यासाठी तातडीच्या वीजखरेदीसह जलविद्युत व अन्य स्त्रोतांकडून वीजपुरवठा उप-लब्ध करण्याचे प्रयत्न सुरू आहे. राज्यात विजेचे भारनियमन टाळण्यासाठी महावितरणकडून शर्थीचे प्रयत्न सुरू असून वीजग्राहकांनी मागणी व उपलब्धता यामध्ये समतोल राखण्यासाठी सकाळी ६ ते १० व सायंकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत विजेचा वापर काटकसरीने करावा असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.**

देशभरात कोळसाटंचाई निर्माण झाल्यामुळे गेल्या काही दिवसांपासून औष्णिक वीजनिर्मिती कोळशाअभावी हळूहळू कमी होत आहे. त्यातच महावितरणला वीजपुरवठा करणाऱ्या औष्णिक वीजनिर्मिती केंद्रातील १३ संच कोळशाअभावी सध्या बंद पडले आहेत. यात महानिर्मितीचे चंद्रपूर, भुसावळ व नाशिक प्रत्येकी २१० मेगावॅटचे तसेच पारस- २५० मेगावॅट आणि भुसावळ व चंद्रपूर येथील ५०० मेगावॅटचा प्रत्येकी एक संच बंद झाला आहे. यासोबतच पोस्टल गुजरात पॉवर लिमिटेडचे (गुजरात) ६४० मेगावॅटचे चार संच आणि रतन इंडिया पॉवर लिमिटेडचे (अमरावती)



८१० मेगावॅटचे तीन संच बंद आहेत. यामुळे महावितरणला औष्णिक वीजनिर्मिती केंद्रांमधून कराराप्रमाणे मिळणाऱ्या विजेमध्ये घट होत आहे.

विजेच्या मागणी व उपलब्धता यामधील सध्या ३३३० मेगावॅटची तूट भरून काढण्यासाठी खुल्या बाजारातून (पॉवर एक्सचेंज) वीज खरेदी सुरु आहे. देशभरात विजेची मागणी वाढल्यामुळे वीज खरेदीचे दर महाग होत आहे. खुल्या बाजारातून ७०० मेगावॅट विजेची खरेदी १३ रुपये ६० पैसे प्रतियुनिट दराने करण्यात येत आहे. तर आज सकाळी रियल टाईम व्यवहारातून ९०० मेगावॅट विजेची ६ रुपये २३ पैसे प्रतियुनिट दराने खरेदी करण्यात आली.

कोळसा टंचाईमुळे विजेचा तुटवडा वाढण्याची शक्यता अधिक असल्याने मागणी व पुरवठा यात समतोल ठेवण्यासाठी वीजग्राहकांनी सकाळी ६ ते १० आणि सायंकाळी ६ ते रात्री १० वाजेदरम्यान विजेचा वापर अतिशय काटकसरीने करावा असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे. विजेची सर्वाधिक मागणी असणाऱ्या कालावधीत विजेचा वापर कमी झाल्यास मागणी व उपलब्धता यातील तूट कमी होईल व भारनियमन करण्याची गरज भासणार नाही.

### कोळसा टंचाईचे सावट गडद

कोळसा टंचाईचे सावट गडद होत असतानाच राज्यात उष्मा वाढल्यामुळे विजेची मागणी देखील वाढली आहे. राज्यात (मुंबई वगळून) काल, शनिवारी १७,२८९ मेगावॅट विजेची मागणीप्रमाणे महावितरणकडून पुरवठा करण्यात आला. तर गेल्या २४ तासांमध्ये राज्याच्या काही भागात पाऊस झाल्यामुळे आज विजेच्या मागणीत घट झाली. आज, रविवारी सकाळी ११.३० वाजता राज्यात १८,२०० मेगावॅट तर महावितरणच्या कार्यक्षेत्रात १५ हजार ८०० मेगावॅट विजेची मागणी होती. विजेचे भारनियमन टाळण्यासाठी मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या आदेशानुसार कृषिवाहिन्यांवर दररोज ८ तास दिवसा किंवा रात्री चक्राकार पद्धतीने थ्री फेज वीजपुरवठा करण्यात येत आहे.

## संक्षिप्त...

### चांदणी बारवर धाड, बारबालांसह ४० जणांवर गुन्हा दाखल

**उल्हासनगर : वृत्तसंस्था**

१७ सेक्शन परिसरातील वादग्रस्त चांदणी बारवर शहर गुन्हे अन्वेषण विभागाने शनिवारी रात्री ९ वाजता धाड टाकून ग्राहकांसोबत अश्लील चाळे करणाऱ्या बारबालांसह एकून ४० जणांना अटक करण्यात आली. याप्रकरणी मध्यवर्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून पोलीस अधिक तपास करीत आहे.

उल्हासनगर कॅम्प नं-३ येथील १७ सेक्शन चौक परिसरात चांदणी बार असून बारमध्ये युट्यूबमधील गाण्यावर बारबालांचे अश्लील चाळे सुरू असल्याची माहिती शहर गुन्हे अन्वेषण विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश तरडे यांना मिळाली. त्यानुसार शनिवारी रात्री साडे नऊ वाजता गुन्हे अन्वेषण विभागाचे प्रमुख महेश तरडे यांच्या मार्गदर्शनाखाली चांदणी बारवर पथकाने धाड टाकली. यावेळी बारबाला युट्युब गाण्यावर ग्राहकांसोबत अश्लील चाळे करून नाचत होत्या. पोलीस पथकाने १७ बारबाला, बार व्यवस्थापक मनोज पात्रा यांच्यासह वेटर, कर्मचारी व १० ग्राहक असे एकून ४० जणांना अटक केली. याप्रकरणी मध्यवर्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून अधिक तपास पोलीस करीत आहे. तसेच शहरातील अनेक लॉजिग-बोर्डिंगवर अवैध धंदे फोपावल्याची चर्चा होऊन कारवाईची मागणी होत आहे.

# मत्स्योउद्योग सहकारी संस्थेच्या फॅक्टरीला न्यायालयाची जप्ती नोटीस

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील दिघोडे येथील ससून डॉक मत्स्योउद्योग सहकारी संस्थेच्या फॅक्टरीच्या उभारणीचे काम मनोज कन्स्ट्रक्शन कंपनीच्या ठेकेदारांनी हाती घेतले होते. परंतु फॅक्टरीचे काम पूर्ण होऊन ही सदर ससून डॉक मत्स्योउद्योग सहकारी संस्थेच्या चेअरमन यांनी ठरल्या प्रमाणे कामांची रक्कम मनोज कन्स्ट्रक्शनच्या ठेकेदाराला न दिल्याने पनवेल येथील वरिष्ठ दिवाणी न्यायालयाने ससून डॉक मस्योउद्योग फॅक्टरीला काल जप्तीची बजावली आहे.

उरण तालुक्यातील दिघोडे येथे २००७ साली ससून डॉक मत्स्योउद्योग संस्थेच्या फॅक्टरीचे मोठ्या गांजावाजा करत माजी केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांच्या हस्ते उद्घाटन करून फॅक्टरी सुरू करण्यात आली होती.प रंतु सदर फॅक्टरीचे काम पुर्ण केल्यानंतर ही मनोज कन्स्ट्रक्शनच्या ठेकेदाराला फॅक्टरीच्या चेअरमन यांनी झालेल्या कामाच्या बिलाची रक्कम देऊ केली नाही.यासंदर्भात मनोज कन्स्ट्रक्शनच्या ठेकेदारानी अलिबाग येथील जिल्हा, सत्र दिवाणी न्यायालयात न्याय मिळवा म्हणून २००७ मध्ये दावा दाखल केला होता.

मनोज कन्स्ट्रक्शनच्या ठेकेदारांच्या माध्यमातून वकिल म्हणून अँड एस.एन.जोशी यांनी काम पाहिले, पनवेल येथील वरिष्ठ सत्र दिवाणी न्यायालयाने ३० सप्टेंबर २०२१ रोजी मनोज कन्स्ट्रक्शनच्या ठेकेदारांच्या बाजूने निकाल दिला. तसेच ससून डॉक मस्योउद्योग सहकारी संस्थेने सदर मनोज



कन्स्ट्रक्शनच्या ठेकेदाराला ७९ लाख ४८ हजार ४७ रुपये व त्यावरील व्याज या स्वरूपात झालेल्या बांधकामाचा मोबदला द्यावा आणि ७ ऑक्टोबर २०२१ रोजी ससून डॉक मत्स्योउद्योग संस्थेच्या चेअरमनी न्यायालयात हजर राहावे असे आदेश दिले.

तब्बल १५ वर्षांच्या कालावधी नंतरही मनोज कन्स्ट्रक्शनच्या ठेकेदारांच्या बाजूने निकाल लागला असतांनाही ससून डॉक मस्योउद्योग सहकारी संस्थेने बांधकामाचा मोबदला देण्यासंदर्भात चालढकल पणा केला. त्यामूळे न्यायालयाच्या आदेशानुसार न्यायालयातील कर्मचाऱ्यांनी दि. ९ ऑक्टोबर २०२१ रोजी फॅक्टरीची जप्ती करून लिलावास काढण्याची नोटीस दिघोडे येथील ससून डॉक मस्योउद्योग सहकारी संस्थेच्या फॅक्टरीवर लावली आहे.त्यामुळे परिसरात एकच खळबळ माजली असून, हा चर्चेचा विषय बनला आहे.

# सुपेगांव रस्त्याला झाडाझुडपांचा विळखा ; सार्वजनिक बांधकाम खात्याचे दुर्लक्ष

## साईडपट्ट्या साफ करण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । राजीव नेवासेकर**

**कोर्लई** : मुरुड-रोहा प्रवासात जवळचा मार्ग असलेल्या मुरुड तालुक्यातील सुपेगांव रस्त्यालगत अनेक ठिकाणी असलेला झाडाझुडपांचा विळखा अप-घाताला आमंत्रण ठरत असून याकडे संबंधित सार्वजनिक बांधकाम खात्याचे दुर्लक्ष असल्याबाबत पर्यटक, प्रवासी, वाहनचालक व नागरिकांतून नाराजी व्यक्त होत असून साईडपट्ट्या साफ करण्याची मागणी केली जात आहे.

मुरुड-जंजिरा पर्यटनात रत्नागिरी, पुणे, कोल्हापूर अन्य ठिकाणाहून काशिद-बिच, फणसाड अभयारण्य, मुरुड-जंजिरा किल्ला पाहाण्यासाठी रोहा सुपेगांव मार्गे मुरुड रस्ता जवळ असल्याने या रस्त्यावर वाहनांची वाढती वर्दळ असते. मागील महिन्यापासून या रस्त्यालगत ब-याच ठिकाणी झाडाझुडपांचा विळखा असून काही ठिकाणी रस्त्यावर झाडे झुकलेल्या अवस्थेत आहेत. वळणात समोरून येणारे वाहन दिसत नसल्याने वेळप्रसंगी अप-घाताची शक्यता नाकारता येत नाही.



शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने यात लक्ष पुरवून सुपेगांव रस्त्यालगत असलेला झाडाझुडपांचा विळखा हटविण्यात यावा. अशी मागणी पर्यटक, प्रवासी, वाहनचालक व नागरिकांतून जोर धरीत आहे.

# माथेरानमध्ये गॅस वाहतुकीसाठी वाहनास परवानगी मिळावी

**दै.रायगड नगरी । माथेरान**

स्वयंपाकमध्ये वापरणाऱ्या गॅसच्या किमतींमध्ये दर महिन्याला होणाऱ्या वाढीने माथेरांकरांचे बजेट कोलमडले असून येथे मालवाहतुकीची व्यवस्था नसल्याने एक सिलिंडर मागे येथील स्थानिकांना १५० रुपये जास्त मोजावे लागत आहेत त्यामुळे येथील स्थानिकांना गॅस वाहतुकीसाठी वाहन वापरण्याची परवानगी मिळाल्यास त्याचा फायदा येथील सर्वसामान्य नागरिकांना होणार आहे.

माथेरान हे समुद्र सपाटीपासून जवळ जवळ



२५०० फूट उंचीवर असलेले एक छोटेसे पर्यटन स्थळ आहे. ब्रिटिशांनी केलेल्या कायद्यानुसार येथे आज ही इंधनावर चालणाऱ्या वाहनांना प्रवेशबंदी आहे त्यामुळे येथे लागणाऱ्या सर्वच जीवनावश्यक वस्तू ह्या घोड्यांच्या पाठीवर लादून वाहतूक केली जाते. त्यामुळे साहजिकच त्या वस्तूंची किंमत वाढते, येथील सर्वच व्यवहार हे पर्यटनावर अवलंबून असल्याने येथील स्थानिकांना ह्या वस्तू चढ्या दराने घ्यायलाच लागतात काहिवर्षा पूर्वी मिनिट्रेन ची मालगाडी सुरू होती तेव्हा भाजीपाला व इतर वस्तू थेट गावामध्ये येत असत पण रेल्वे प्रशासनाने ही सेवा बंद केल्यानंतर त्याऐवजी शासनाने आजपर्यंत माथेरान करांसाठी मालवाहतुकीची दुसरी व्यवस्था केलेली नाही किव्हा अशी काही व्यवस्था सुरू होईल अशाप्रकारची हालचाल ही दिसत नाही त्यामुळेच येथे सर्व वस्तू चढ्या दराने विकले जात आहेत.

माथेरानमध्ये इंधनावर चालणारी वाहने बंदी आहे पण इंधनाचे दर वाढताच येथील सर्वच जीवनावश्यक वस्तूंचे दर वाढत असतात व एकदा वाढलेले दर पुन्हा खाली येत नाहीत त्यामुळे येथील .../२

# अतिवृष्टीने शिहू बेणसे झोतिरपाडा विभागातील शेतकरी हवालदिल

## शासनाने नुकसान भरपाई द्यावी, आस्मानी संकटाशी झुंजणाऱ्या शेतकऱ्यांची मागणी

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

परतीच्या व अवकाळी पावसाचा मोठा फटका शिहू बेणसे झोतिरपाडा विभागासह संपूर्ण जिल्ह्यांतील शेतकऱ्याला बसला आहे. ऐन कापणीच्या हंगामात पावसाने जोरदार हजेरी लावल्याने शेतकऱ्यांवर मोठे संकट ओढवले आहे. बहरलेली पिके डोळ्यादेखत चिखलात आडवी झाल्याने हातातोंडाशी आलेला घास गळून पडला आहे, अशातच जगाचा पोशिंदा असलेल्या शेतकरी मात्र पूर्णतः हतबल व हताश झाला आहे. निसर्गाचा प्रकोप जगू देत नाही, मायबाप सरकारने आम्हा शेतकऱ्यांना मदतीचा हात द्यावा असे साकडे नुकसानग्रस्त शेतकरी घालत आहे. शेतकऱ्यांची व्यथा मांडण्यासाठी व शासनाने नुकसानीची योग्य ती भरपाई द्यावी यासाठी रायगड जिल्हा शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष अनंत भुरे यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळ रायगड जिल्हाधिकारी यांची भेट घेणार असल्याचे सांगण्यात आले.



अतिवृष्टीने व परतीच्या पावसाने उभे पिक शेतात आडवे झाले. तर अनेक ठिकाणी कापलेल्या पिकांची नासाडी झाली. परिणामी येथील शेतकर्यांच्या हातोंडातील घास गळून पडल्याने शेतकरी चिंतातूर व व्याकुळ झाला आहे. सततच्या अतिवृष्टीने भाताच्या फुलावर पाउस पडल्याने फुले झडून गेली. भाताच्या लोंबीत दाणा तयार झाला नाही. त्यानंतर जो भात निसावला गेला त्या भात पिकावर सतत अतिवृष्टी झाल्याने भात जमिनदोस्त होवून भाताच्या लोंब्यांना अंकूर फुटले. त्यामुळे शेतकरी नुकसानीच्या या धक्क्यातून अद्यापही सावरला नाही. एकेकाळी भाताचे कोठार म्हणून ओळखल्या जाणार्या रायगड जिल्ह्या-तील शेती व शेतकरी आता खुप मोठ्या नैसर्गीक व मानवनिर्मित संकटात सापडला आहे. शेती व्यवसाय आता आव्हानात्मक व्यवसाय ठरत आहे. मागील तीन वर्षांत येथील भातशेतीचे प्रमाण तब्बल तीस टक्यांनी घटले आहे. पावसाचा अनियमितपणा, सातत्याने होणारे हवामान बदल व नैसर्गीक आपत्ती, तुकड्यांमध्ये विभागलेली शेती, वाढते औद्योगिकिकरण व वसाहतीकरण आणि उत्पादनापेक्षा उत्पादनखर्च अधिक या सर्व अडचणींमध्ये येथील बळीराजा अडकला आहे. त्यात अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची तुटपुंजी मदत यामुळे येथील शेतकरी आता शेतीपासून दूर होत चाललेला दिसत आहे. रायगड कोकण सह विविध जिल्ह्यात पूरपरिस्थिती उद्भवून राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये पिके व नागरिकांच्या मालमत्तेचं मोठं नुकसान झालं आहे. .../२

# गॅस सिलेंडरच्या स्फोटात झोपडी पेटली

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका झोपडीत गॅस सिलेंडर स्फोट झाल्याने ती झोपडी पेटल्याची घटना पनवेल जवळील करंजाडे फाटा येथे घडली असून सुदैवाने कोणतीही जीवीतहानी झालेली नाही आहे.

येथील से.-२ परिसरात असलेल्या रस्त्यावरील एका कोपऱ्यात झोपडपट्टी आहे. त्या झोपडपट्टीत मध्यरात्रीच्या सुमारास एका झोपडीत गॅस सिलेंडर स्फोट होऊन अचानकपणे आग लागली. या आगीची माहिती मिळताच परिसरातील रहिवाशांनी त्याठिकाणी धाव घेतली. तसेच तातडीने अग्निशमन दलाला व पनवेल शहर पोलिसांना कळविण्यात आले व ती पथकेसुद्धा त्वरीत घटनास्थळी पोचून आग आटोक्यात आणल्याने पुढील अनर्थ टळला आहे.

# १ लाख ७४ हजारांची ऑनलाईन फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

१ लाख ७४ हजारांची ऑनलाईन फसवणूक एका वृद्ध इसमाची झाल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे.



गौतम घटक (वय-६०, रा.-तक्का) असे या इसमाचे नाव असून त्यांना एका अज्ञात इसमाने फोन करून तो एक्सिस बँक क्रेडिट कार्ड डिपार्टमेंटमधून बोलत असल्याचे सांगून त्यांच्या क्रेडिट कार्डवर रिवार्ड पॉईंट्स जमा झाली असून ते तुम्ही रिडीम करून घ्या असे खोटे सांगून त्यांच्या क्रेडिट कार्ड क्रमांकाची सर्व माहिती घेऊन त्यानंतर त्याने बँकेच्या खोट्या साईटवर जाण्यास सांगून त्यांच्या सर्व माहितीच्या आधारे त्यांच्या क्रेडिटकार्ड वरून त्यांच्या संमतीशिवाय कोणत्यातरी अनोळखी खात्यावर एकूण १,७४,३९७ रू. ट्रान्सफर करून त्यांची ऑनलाईन फसवणूक केल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

# शिक्षकांविना शाळा

देशाचे भवितव्य शाळांतील वर्गांमध्ये आकार घेत असल्याचे कोठारी आयोगाने म्हटले, त्यालाही आता पन्नास वर्षांहून अधिक काळ लोटला. त्यानंतर तीन-चार पिढ्या शाळांतून बाहेर पडल्या. पाच दशकांत खूप काही बदल झाले, शिक्षणाचा परीघ विस्तारला, शाळांची संख्या कैकपट वाढली, विद्यार्थिसंख्याही वाढली; परंतु काही बाबतीत तेव्हाचे आणि आताचे वर्तमान यांत फरक नाही. एकूण देशांतर्गत उत्पादनाच्या (जीडीपी) सहा टक्के रक्कम शिक्षणावर खर्च (खरे म्हणजे गुंतवणूक) करावी, ही कोठारी आयोगाची शिफारस आजही कागदावर आहे. उलट खर्चाचे प्रमाण घटलेलेच असल्याने शाळांतील शैक्षणिक सुविधा, पायाभूत सुविधा आणि शिक्षक यांबाबतची कमतरता कायम आहे. संयुक्त राष्ट्रांच्या शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघटनेने (युनेस्को) देशातील शिक्षण स्थितीबाबत यंदा प्रसिद्ध केलेला अहवाल यावर प्रकाश टाकणारा असून, त्याकडे धोरणकर्त्यांना दुर्लक्ष करता येणार नाही. 'नो टीचर, नो क्लास' हे अहवालाचे नावच देशातील शिक्षण आणि शिक्षकांच्या स्थितीबद्दल पुरेसे भाष्य करते. देशातील १५.५१ लाख शाळांपैकी १.१० लाख शाळा एकशिक्षकी असून, शिक्षकांच्या ११.१६ लाख जागा रिक्त आहेत. एकशिक्षकी शाळांपैकी ८९ टक्के शाळा आणि शिक्षकांच्या रिक्त जागांपैकी ६९ टक्के जागा ग्रामीण भागात आहेत. ही आकडेवारी शिक्षणामधील शहरी-ग्रामीण भेद रुंदावत असल्याकडे अंगुलिनिर्देश करते. खरे तर हे आकडे आणि निष्कर्ष यासाठी युनेस्कोच्या अहवालाची गरज नाही; कारण ही वस्तुस्थितीच आहे. देशांतर्गत पाहणीतून; तसेच सरकारी अहवालांतूनही ती वेगवेगळ्या प्रकारे समोर येत असते. युनेस्कोने या अहवालासाठीही सरकारी आकडेवारीचाच आधार घेतला आहे. असे असूनही शैक्षणिक वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष होते. म्हणून अशा अहवालांच्या निमित्ताने याबाबत चर्चा करणे आवश्यक ठरते. विद्यार्थी हा शिक्षणाचा केंद्रबिंदू खरा; परंतु शिक्षक त्याला घडवित असतात. त्यामुळे शिक्षण व्यवस्थेत शिक्षकाला अनन्य स्थान आहे. शिक्षकांबद्दल समाजात दोन टोकांच्या प्रतिमा आहेत. एकीकडे 'गुरू' मानून त्यांची पूजा, तर दुसरीकडे हेटाळणीच्या स्वरात अवहेलना केली जाते. शिकविणे ही एक अवघड बाब असून, त्यासाठी व्यावसायिक प्रशिक्षण महत्त्वाचे असते, ही बाब समाज विसरतो. शिक्षकांचे काम, त्यांना मिळणाऱ्या सुट्ट्या यांबाबत अनेक गैरसमज आहेत. दुसरीकडे सरकार शिक्षकांना सतत कोणत्या ना कोणत्या अशैक्षणिक कामांना जुंपत असते. समाजाच्या सर्व घटकांतील मुलांपर्यंत दर्जेदार शिक्षण पोहोचण्यासाठी शाळांमध्ये आणि सुविधांमध्ये गुंतवणूक वाढण्याची गरज आहे; जोडीला शिक्षकांना दर्जेदार प्रशिक्षण देण्याची, त्यांना कामात मोकळीक देण्याची आवश्यकता आहे. युनेस्कोच्या शिफारशीही याच धर्तीच्या आहेत. करोनाच्या साथीत आघाडीवर कार्य करणाऱ्यांसाठी 'फ्रंटलाइन वर्कर' असा शब्दप्रयोग करण्यात आला. शिक्षकांनाही 'फ्रंटलाइन वर्कर'चा दर्जा दिला जावा, ही युनेस्कोची शिफारस महत्त्वाची आहे; मात्र केवळ तसे संबोधन करून चालणार नाही, तर त्यासाठी अभिप्रेत असलेली कृतीही करावी लागेल. शिक्षकांच्या रिक्त जागा भरण्याला, एकशिक्षकी शाळा द्विशिक्षकी करण्याला, शिक्षकांच्या प्रशिक्षणाला प्राधान्य देण्याची आवश्यकता आहे. शिक्षकांवर इतर अशैक्षणिक कामांचे ओझे लादण्याची सध्याची प्रथा बंद करावी लागेल. ती बंद करण्याच्या घोषणा अधूनमधून होत असल्या, तरी प्रत्यक्षात ती चालूच आहे. शिक्षकांच्या सर्वाधिक रिक्त जागा उत्तर प्रदेशात आहेत. तिथे ३.३ लाख जागा रिकाम्या आहेत. त्यानंतर बिहार (२.२ लाख), पश्चिम बंगाल (१.१ लाख) यांचा क्रमांक लागतो. महाराष्ट्रातही ७४,४४५ जागा रिक्त असून, एकूण शिक्षकांशी असलेले त्याचे प्रमाण १४ टक्के आहे. एकशिक्षकी शाळा आणि शिक्षकांच्या रिक्त जागा यांचे ग्रामीण भागातील वाढते प्रमाण चिंताजनक आहे. शिक्षणाद्वारे समानतेची संधी मिळते हे खरे असले, तरी प्रत्यक्षात शिक्षणाची संधी सर्वत्र समान प्रकारे उपलब्ध नाही. शाळा, शैक्षणिक सुविधा, शिक्षकांचे प्रमाण, अन्य पूरक सुविधा यांवरून शहरी-ग्रामीण असा मोठा भेद आहे. शहरांतही उच्चभ्रूंच्या शाळा वेगळ्या आणि गरिबांच्या वेगळ्या अशी स्थिती आहे. शिक्षणातूनही विषमता वाढण्याचा हा प्रकार थांबण्याची गरज आहे. उदारीकरणाचे धोरण स्वीकारल्यानंतरच्या गेल्या तीन दशकांत ही विषमता वाढत आहे. याच काळात शिक्षणाचा परीघ विस्तारत गेला हे खरे; परंतु तो पुरेसा नसल्याचे विविध अहवालांतून समोर आले आहे. युनेस्कोच्या ताज्या अहवालाने हीच बाब अधोरेखित केली आहे. विषमता दूर करण्यासाठी सरकारकडून कृती होत नाही. नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणानेही शिक्षणावरील खर्चाबाबत मौन धारण केले आहे. शिक्षकांविना शाळा असू शकत नाहीत, हे लक्षात घेऊन शिक्षणातील गुंतवणूक वाढविणे हाच यावरील उपाय आहे.

# खा.तटकरे यांनी फेडला कलमजाईदेवीचा नवस





**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील तुर्भे पंचक्रोशीतील जागृत देवस्थान श्रीकलमजाई देवीच्या मंदिरातील जत्रेवेळी तत्कालीन राजिप अध्यक्षा आणि विद्यमान पालकमंत्री ना.अदिती तटकरे यांनी त्यांचे वडील आणि लोकसभा निवडणुकीतील उमेदवार सुनील तटकरे प्रचारादरम्यान केलेला नवस फेडण्यासाठी रविवारी सकाळी खा.तटकरे यांनी श्रीकलमजाई मंदिरामध्ये जाऊन नवसपूर्ती केली. मात्र, यावेळी ग्रामस्थांनी उत्स्फूर्तपणे खा.तटकरे यांनी पुढीलवेळी केंद्रीय मंत्री म्हणून या मंदिरात पुन्हा यावे, असा नवस करून खा.तटकरे यांच्याप्रती त्यांचे प्रेम व्यक्त केले.

पोलादपूर तालुक्यातील तुर्भे खुर्द आणि वझरवाडी गावांच्या सीमावर्ती भागात देवी कलमजाई मंदिर असून देवी कलमजाई, रवळनाथ, कुंभळजादेवी, देवीळमाळ, काळकाई आदी पंचायतन आहे तर समोरच वझरवाडीची गावपांढरदेखील आहे. याठिकाणी खा.सुनील तटकरे यांच्यासोबत सहदेव उतेकर, मधुकर उतेकर, सुदास मोरे, गोविंद उतेकर, मंगेश उतेकर, दत्ताराम उतेकर, वामन उतेकर, नामदेव उतेकर, कृष्णा उतेकर, नामदेव उतेकर, माजी सरपंच साक्षी मंगेश उतेकर, भगवान जाधव, सुर्यकांत जाधव, महादेव जाधव, बळीराम चव्हाण, अर्जून जाधव, नवनाथ शिंदे, श्रीहास शिंदे, शांताराम जाधव, शिवाजी जाधव, वसंत जाधव, सखाराम चव्हाण, शिवराम उतेकर, राजाराम उतेकर, सुंदर उतेकर, यशवंत उतेकर, ज्ञानदेव उतेकर, आत्माराम उतेकर आदी ग्रामस्थ नवसपूर्तीसाठी उपस्थित होते. यावेळी मधुकर उतेकर यांनी खा.तटकरे यांना ब्रिटीशकालीन पहिल्या महायुध्दातील शहिद स्तंभाच्या परिसराचे सुशोभिकरण करण्याचे निवेदन दिले.

याप्रसंगी खा.सुनील तटकरे यांनी कोरोना परिस्थितीमध्ये नवस फेडण्यास विलंब झाला असल्याने ग्रामस्थांची क्षमा मागून ग्रामस्थांचा विचार झाल्यास आपण स्वत: आणि पालकमंत्री ना.अदिती तटकरे या मंदिराच्या जिर्णोध्दाराची संधी दिल्यास सेवा करण्यास तयार असल्याची ग्वाही दिली. या परिसरातील लोकांनी दिलेल्या सहकार्यामुळे खासदार झाल्याबद्दल ऋण मानत असून येथील सेवेची संधीही मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सुदास मोरे यांनी केले.

रयतच्या न्यू इंग्लिश स्कूल तुर्भेला भेट

पोलादपूर तालुक्यातील रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल तुर्भेच्या इमारतीला खा.सुनील तटकरे यांनी भेट देऊन नवीन इमारत उभारण्याकामी रयतच्या विद्यामंदिर पोलादपूर इमारतीप्रमाणे सहकार्य करावे, अशी आग्रही भूमिका सुदास मोरे, नाना गुरूजी, शिवराम उतेकर, सिताराम तथा नाना जाधव, कृष्णा उतेकर, सहदेव उतेकर, केशव खेडेकर, नरेश शेलार आदींनी घेतल्यामुळे खा.तटकरे यांनी या इमारतीची पाहणी केली.

यावेळी ग्रामस्थांनी शाळेच्या जमिनीचा सातबारा ग्रामस्थांच्या नावावरच राहिल अशापध्दतीने नव्या इमारतीची उभारणी करण्यासंदर्भात खा.सुनील तटकरे यांना साकडे घातले.

खा.तटकरे यांनी यावेळी शिक्षणप्रेमी ग्रामस्थांसमोर बोलताना, रयत शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदी माननीय राष्ट्रीय नेते शरदश्चंद्र पवार असल्याने आपण या माध्यमिक शाळेच्या इमारतीबाबत काही विशेष सहकार्य करण्यासाठी निश्चितच महत्वाची भूमिका बजावू, असा विश्वास व्यक्त केला. या दौऱ्यामध्ये खा.तटकरे यांच्यासमवेत महाड विधानसभा अध्यक्ष बाबू खानविलकर, जिल्हा महिला संघटक प्रतिमा अभंग जाधव, सेवादल जिल्हा अध्यक्ष वाय.सी.जाधव, सरचिटणीस सुहास मोरे, महमद मुजावर, भाई पाटेकर, मुजम्मील तांबे, अनिलकुमार भोसले तसेच अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# माथेरान मधील एटीएम व बीएसएनएल नॉटरिचेबल ; पर्यटक हैराण

**दै.रायगड नगरी । मुकूंद रांजाणे**



**माथेरान** : माथेरानमधील एकमेव बँक असलेल्या युनियन बँकेच्या सेवेला मागील काही वर्षापासून घरघर लागली असून अनियंत्रित सेवेमुळे माथेरांकर हैराण झाले आहेत ह्या बँकेच्या मार्फत गावातील एकमेव एटीएम सेवा चालविली जाते पण नेमक्या विकेंड लाच हे एटीएम बंद पडत आहे तर बँकेमधील ऑनलाईन सेवाही नेहमीच बंद राहत असल्याने नागरिकांना पासबुक वर एन्ट्री मिळण्यास विलंब होत असतो व बँकेबाहेर तासनतास ताटकळत उभे राहावे लागत आहे माथेरान मधील अनेकांनी ह्या विरोधात तक्रारी करून देखील ही सेवा जैसे थे आहे.

माथेरान या मुंबई पासून सर्वात जवळ असलेल्या पर्यटनस्थळी सुट्टी एन्जोय करण्यासाठी येत असतात. तेथे असलेल्या पर्यटन व्यवसायासाठी सर्वात म्हहात्वाचे साधन म्हणजे दूरसंचार सेवा. माथेरानचे आर्थिक नियोजनाचा मुख्य भार असणाऱ्या टेलीफोन सेवेमुळे प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत. केवळ मनस्ताप नाही तर माथेरान मधील व्यावसायिक यांचे आर्थिक नुकसान मोठ्या प्रमाणात होण्यास देखील दूरसंचार सेवा जबाबदार आहे. भारत दूरसंचार निगम च्या अशा भोंगळ कारभारामुळे माथेरान कर दूरसंचारच्या सेवेला पूर्णपणे कंटाळले आहेत. दरम्यान, गेली तीन वर्षे सतत असे प्रकार होत असल्याने माथेरान मध्ये अनेकांनी दूरसंचार निगमच्या सेवेला रामराम करून खाजगी कंपनी यांची सेवा स्वीकारण्यास सुरुवात केली आहे.

माथेरान हे पूर्वी पूर्णपणे भारत दूरसंचार निगमच्या सेवेवर अवलंबून होते. माथेरान मधील हॉटेल व्यावसायिक, स्थानिक रहिवाशी तसेच लहान सहान उद्योजक यांच्याकडे मिळून किमान पाचशे टेलिफोन होते. त्यानंतर माथेरान मध्ये दूरसंचार निगमच्या मोबाईल सेवेला प्रचंड प्रतिसाद होता. जवळपास आठशे ग्राहक दूरसंचार निगम ची सेवा वापरत होते. मात्र आता परिस्थितीत फार बदलली आहे . कारण आज चा विचार करता जवळपास शंभर दूरध्वनी केवळ राहिले आहेत. त्यांची देखील सेवा पर्यटन हंगाम असलेल्या शनिवार आणि रविवारी बंद असते. अशावेळी पर्यटन व्यवसायावर मोठा परिणाम होत असल्याने अनेकांनी आपली मोबाईल सेवा देखील बदली करून घेतली आहे. अन्य नेटवर्क असलेल्या खाजगी कंपनी यांची सेवा चांगली मिळत असल्याने हा बदल सर्वांना व्यवसायासाठी करावा लागला आहे. त्यात महिन्यातून पंधरा दिवस माथेरान मध्ये दूर संचार निगम ची सेवा बंद असते. त्यामुळे युनियन बँकेचे एटीएम, विविध हॉटेल व्यावसाईक यांची बुकिंग, क्रेडीट कार्ड यांची सुविधा बंद पडते. त्यामुळे होणारे नुकसान याची मोजदाद केली असता माथेरान मध्ये भारत दूरसंचार निगम ची सेवा कोणालाही फायद्याची नाही.

दुसरीकडे माथेरान मध्ये भारत दूरसंचार निगम जाणीवपूर्वक सेवा देण्यास टाळाटाळ करीत असल्याचा आरोप माथेरान कर करीत आहेत. कारण माथेरान मध्ये असलेल्या टेलिफोन कार्यालयात असलेले ऑपरेटर यांचे पाद गेली काही महिन्यापासून रिक्त आहे आहे. त्यामुळे कोणीही तंत्रज्ञ नसल्याने माथेरान मधील कार्यालय ओस पडलेले असते. त्याशिवाय गंभार बाब म्हणजे माथेरान मध्ये असलेल्या भारत दूरसंचार निगम च्या मोबाईल टॉवरला दोन खाजगी कंपनी चे मोबाईल यंत्रे बसविली आहेत. त्यांची सेवा कधीही बंद होत नाही, परंतु बीएसएनएल ची सेवा दर आठवड्याला कोलमडून पडते. याचे गौडबंगाल कोणालाही समजून येत नाही. भारत दूरसंचार निगम च्या टॉवर मधून अन्य खाजगी कंपनी सेवा देतात. मात्र ज्यांची मालकी आहे, त्यांची सेवा नाही हा विरोधभास न समजण्यासारखा आहे. दरम्यान, त्यामुळेच माथेरान मधील जनतेने आता भारत दूरसंचार निगम ला दूर ठेवले असल्याचे उघड होत आहे.

> माथेरान मध्ये उपलब्ध असलेली एकमेव बँक व त्यानचेच सुरू असलेले एटीएम व्यवस्थेची एकदम दुरावस्थ झाली असून शासनाच्या कॅशलेस नाऱ्याचा बोजवारा उडाला आहे इथे येणारे पर्यटक रोख रक्कम घेऊन येत नसल्याने त्यांना एटीएम बंद असल्याने मोठ्या त्रासास सामोरे जावे लागत असून इच्छा असुनही मनासारखी खरेदी करु शकत नसल्याने त्याचा फटका येथील व्यावसायिकांना सोसावा लागत आहे.
>
> **(भास्कर शिंदे, व्यावसायिक)**

पृष्ठ क्र.१ वरुन...

## गॅस दरवाढीने माथेरानकर हैराण ; गॅस वाहतुकीसाठी वाहनास परवानगी मिळावी

स्थानिकांना वाहन नाही पण इंधन दर वाढीचे चटके नेहमीच सोसावे लागत असतात मागील काही दिवसांमध्ये इंधन दर वाढीमुळे येथील किराणा, भाजी, चिकन, अंडी दूध या सारख्या वस्तूंचे भाव वाढले आहेत व माथेरान हे पर्यटनस्थळ असल्याने ह्या सर्व वस्तू येथील व्यावसायिकांसाठी गरजेच्या वस्तू आहेत, ही होत असलेली भाववाढ रोखणे यांच्या हाती नाही पण स्वतः विकणाऱ्या वस्तूंचे भाव वाढविले असता सर्वत्र रोष निर्माण होत असतो पण शासन मात्र ह्याकडे कानाडोळा करताना दिसून येत आहे. त्यामुळेच निदान गॅस वाहतुकीसाठी तरी अतिशर्तींवर वाहन सुरू करण्याची परवानगी मिळावी की जेणे करून स्थानिकांचे निदान १५० रू.तरी वाचतील.

## शिहू बेणसे झोतिरपाडा विभागातील शेतकरी हवालदिल

राज्य सरकारने अतिवृष्टीमुळे बाधित शेतक-यांना मोठा दिलासा दिला आहे. जुलै २०२१ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे राज्यात विविध जिल्ह्यात पूरपरिस्थिती उद्भवली. ह्यात शेतपिकांचं मोठं नुकसान झाली. याच पार्श्वभूमीवर, दिलासा देत आता राज्य सरकारकडून शेतपिकांच्या नुकसानाकरिता बाधितांना एकूण ३६५ कोटी ६७ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. मात्र झालेल्या नुकसानीचे वस्तुस्थिती नुसार पंचनामे व प्रत्यक्षात भरपाई द्यावी अशी मागणी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी केलीय. शेतकर्याला सरकारने आधार देणे गरजेचे आहे. मात्र तसे होतांना दिसत नाही. त्यामुळे जिल्ह्याची मुख्य ओळख असलेला कृषीव्यवसाय येत्या काळात धोक्यात येण्याची भीती आहे. शासनाकडून याची लवकर नोंद घेणे आवश्यक आहे. शासनाने संकटकाळी व नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतकऱ्यांना योग्य नुकसानभरपाई व मदतीचा हात देऊन शेतकर्यांना दिलासा दिला तरच कुठे शेती व्यवसाय तरु शकेल अन्यथा येथील बळीराजा शेतीपासून कायमचा दूर जाईल. हे निश्चित.

# शेतकरी विरोधी भूमिका घेणाऱ्या भाजपा विरोधात महायुतीचा आज बंद : आ.महेंद्र दळवी

**दै.रायगड नगरी । पेण**



उत्तर प्रदेशातील लखिंमपुर खीरी येथे निष्पाप शेतकऱ्यांना चीरडणाऱ्या भाजपच्या केंद्रीय गृहमंत्र्यांच्या पुत्रावर कडक कारवाई करून निष्पाप शेतकऱ्यांना न्याय देण्याच्या मागणी करिता महायुतीने पुकारलेल्या बंद मध्ये पेणकरांनी सामील होऊन बंद यशस्वी करा असे आवाहन शिवसेनेचे रायगड जिल्हा प्रमुख आमदार महेंद्र दळवी यांनी पेण येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत केले.

शेतकऱ्यांना गाडीखाली चिरडून मारल्यानंतर त्या शेतकऱ्यांच्या नातेवाईकांना भेटण्यासाठी गेलेल्या विरोधी पक्षातील नेत्यांना उत्तर प्रदेशातील भाजप सरकारने रोखून धरले. हा घटनेने दिलेल्या मूलभूत अधिकारांचा भंग आहे. सत्य दडपून भाजप नेत्याच्या पुत्राला वाचवण्याचा भाजप सरकारने सुरु केलेला प्रयत्न हाणून पाडण्यासाठी सर्वांनी स्वयंस्फूर्तीने सदरच्या बंदमध्ये शामिल होऊन शेतकऱ्यांच्या पाठीमागे सामान्य जनता उभी आहे हे दाखवून द्या असे आवाहन आमदार दळवी यांनी पेण येथे केले.

या पत्रकार परिषदेला शिवसेना जिल्हा प्रमुख तथा आमदार महेंद्र दळवी, माजी जिल्हा प्रमुख विष्णूभाई पाटील, उपजिल्हाप्रमुख नरेश गावंड, पेण तालुका प्रमुख अविनाश म्हात्रे, अलिबाग तालुकाप्रमुख राजा केणी, जिल्हा परिषद विरोधी पक्षनेते सुरेंद्र म्हात्रे, शिवसेनेचे सल्लागार किशोर जैन, महिला आघाडीच्या दीपश्री पोटफोडे, शहर प्रमुख सुधाकर म्हात्रे, माजी शहर प्रमुख अशोक वर्तक, अनंत पाटील, युवासेनेचे जिल्हा प्रमुख सुधीर ढाणे, आशिष वर्तक, ओंकार दानवे, अच्युत पाटील, नरेश सोनवणे, संजय पाटील, उपतालुका प्रमुख भगवान पाटील, विभाग प्रमुख राजा पाटील, लव्हेद्र मोकल, तुकाराम म्हात्रे, लहू पाटील, बाळु पाटील, प्रसाद देशमुख, विशाल दोशी यांच्यासह शिवसैनिक मोठ्या संख्येने हजर होते.

# मुरुड तालुका विधी सेवा समितीतर्फे मानसिक आरोग्य दिनानिमित्ताने मार्गदर्शनपर शिबिर संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण सर्वोच्च न्यायालय दिल्ली तसेच महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण उच्च न्यायालय मुंबई व रायगड जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या कडून प्राप्त झालेल्या निर्देशानुसार दि.२ ऑक्टोबर ते दि.१४ ऑक्टोबर २०२१ या कालावधीत भारतभर जागरूकता अभियान व पोहच या कार्यक्रमांतर्गत मुरुड तालुका विधी सेवा समितीतर्फे अध्यक्ष न्यायाधीश संदीप सरोदे यांच्या मार्गदर्शना खाली तालुका पंचायत समितीच्या सभागृहात मानसिक आरोग्य दिनानिमित्त, मानसिक व विकलांग व्यक्ती या विषयावर मार्गदर्शन पार शिबिर आयोजित करण्यात आले होते.

मुरुड विधी सेवा समिती अध्यक्ष न्यायाधीश संदीप सरोदे, ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ.विजय हडबे, अन्वर हुसेन, ऍड. डी. एन. पाटील, न्यालयीन कर्मचारी जयेश गुरव, तसेच सर्व शासकिय कर्मचारी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुरुड ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. विजय हडबे यांनी मानसिक आरोग्य व विकलांग या विषयावर मार्गदर्शनपर माहिती दिली.


**जाहीर प्रगटन**

या जाहीर प्रगटना द्वारे सर्व लोकांना कळवण्यात येत आहे की माझे अशील, **श्री. प्रशांत वसंत चव्हाण**, सी. बी. डी. बेळापुर, नवी मुंबई, (यानंतर "माझे अशील" म्हणून संबोधले गेले आहेत) यांनी **'श्री अशोक स. केजरीवल'**, रहिवासी सूरत, गुजरात, **'श्री. रघुनाथ दादू म्हात्रे व इतर**, रहिवासी: कोपरोली, रायगड, महाराष्ट्र-410206 व **श्री. कमळाकर हरी म्हात्रे**, रहिवासी: कोपरोली, रायगड, महाराष्ट्र-410206 यांच्या मालकी व कंबज्याची जमीन जे दुय्यम निबंधक उरण, यांच्या कार्यक्षेत्रातील मौजे कोपरोली व मौजे मोठीजुई, तालुका उरण, जिल्हा रायगड, ज्याचे वर्णन खालील प्रमाणे आहे:

१. **श्री. अशोक स. केजरीवल**

| गाव | सर्वे नंबर | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| कोपरोली | १३/२ | 0.24.8 |
| ---\|\|--- | १३/५ | 0.06.06 |
| ---\|\|--- | १४/१ ब | 0.65 |
| मोठीजुई | १२३/४ | 0.22.03 |
| ---\|\|--- | १२३/५ | 0.13.10 |
| ---\|\|--- | १२३/६ | 0.31.06 |
| ---\|\|--- | १२३/७ | 0.23.30 |
| ---\|\|--- | १२४/६ | 0.07.03 |
| ---\|\|--- | १२४/७ | 0.09.40 |
| ---\|\|--- | १२५/९ | 0.11.06 |
| ---\|\|--- | १२५/१३ | 0.04.30 |
| ---\|\|--- | १२६/५ | 0.44.30 |
| ---\|\|--- | १२६/६ | 0.33.09 |
| ---\|\|--- | १३०/४ | 0.45.00 |
| ---\|\|--- | १२५/२ | 0.46.08 |

२. **श्री. रघुनाथ दादू म्हात्रे व इतर**

| गाव | सर्वे नंबर | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| कोपरोळी | १६/१ | १७.३० गुं. |

३. **श्री. कमळाकर हरी म्हात्रे व इतर**

| गाव | सर्वे नंबर | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| कोपरोळी | १६/१७-अ | २३.५० गुं. |

वरील वर्णनाची मिळकत खरेदी करू इच्छित आहेत. तरी, सादर मिळकतीच्या व्यवाहराबद्दल, कोणाचा आक्षेप किंवा हरकत असेल, किंवा हक्कपरकार, हितसंबंध असल्यास योग्य कागदपत्रा सहीत सादर नोटिस/ जाहीर प्रगटण प्रसिद्ध झाल्या पासून १५ दिवसांच्या आत, खालील वकिलांच्या पत्त्यावर लेखी आक्षेप नोंदवावा, अथवा असा कोणाचा ही हक्क सादर मिळकतीशी नाही किंवा आक्षेप नसल्याचे समजण्यात येईल. कृपया याची नोंद घ्यावी.

**मार्फत,**
**ॲड. मुनिर आर. मोहम्मद**
**सी-1101, इमपिरीयल टॉवर्स, एन. आई. बी. एम. रोड, पुणे-६०**
**भ्रमणध्वनी:** 9673639930


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## पोलादपूर तालुक्यात सूक्ष्म उद्योजकता वाढीसाठी पुन्हा व्यापक प्रयत्न

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील विविध प्रकारच्या सूक्ष्म आणि लघू उद्योगांना प्रोत्साहन देण्याकामी पुन्हा एकदा व्यापक प्रयत्न सुरू होणार असून राष्ट्रीयकृत बँका आणि तालुका कृषी कार्यालयाच्या पुढाकाराने नजिकच्या काळात सर्व प्रकारचे सूक्ष्म व लघू उद्योग केंद्र सरकारच्या नवीन सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योग खात्याच्या माध्यमातून अधिकाधिक प्रमाणात उभारण्यात येण्याचे ध्येय निश्चित करण्यात आले. प्रक्रिया उद्योजक व महिला बचत गटांचे प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना तसेच सामूहिक शेती या विषयावर यावेळी प्रशिक्षण घेण्यात आले.

पोलादपूर शहरातील हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे सभागृहामध्ये सूक्ष्म उद्योजकता वाढीसाठी शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी व्यासपिठावर रायगड जिल्हा परिषदेच्या सदस्या सुमन कुंभार, पं.स.सदस्य यशवंत कासार, प्रगतशील शेतकरी उद्यानपंडीत रामचंद्र कदम, बॅक ऑफ इंडियाचे व्यवस्थापक विनीत, युनियन बँक ऑफ इंडियाचे व्यवस्थापक सुनील कुमार, कापडे बुद्रुक ग्रुपग्रामपंचायतीच्या सरपंच सुवर्णा सकपाळ, तालुका कृषी अधिकारी सुरज पाटील, विविध उद्योग करणारे रामदास कळंबे, तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक कपिल पाटील तसेच सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योगांचे पुनरूज्जीवन करणाऱ्या यंत्रणांचे प्रतिनिधी व्यासपिठावर उपस्थित होते.

याप्रसंगी प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनेचे डिस्ट्रिक्ट रिसोर्स पर्सन राहुल जोशी यांनी नवीन उद्योग व असलेले जुने उद्योग सक्षम करण्यासाठी कर्ज बँकेकडून कसे घेता येईल व त्याला शासन ३५ टक्के अनुदान देय आहे याबाबत सविस्तर माहिती सांगितली. याप्रसंगी तालुका कृषी अधिकारी सुरज पाटील यांनी कृषी विभागाच्या विविध योजना व सामूहिक शेती सामूहिक भाजीपाला लागवड करावी, त्यास मार्केट उपलब्ध आहे. विकेल तिथे पिकेल अंतर्गत आठवडा बाजार पोलादपूर तालुक्यात सुरू आहे यात शेतकऱ्यांना थेट विक्री केल्यामुळे चांगला दर मिळेल, अशी ग्वाही दिली.

यावेळी पोलादपूर तालुक्यातील उद्योजक शैलेश पालकर यांनी अनुभव सांगताना, बुडीत कर्ज झालेल्या उद्योजकांना योग्य कर्जपुरवठा झाला नाही, अनुदानाच्या रकमा अडवून ठेवल्या गेल्या, कमर्शियल दराने विद्युत पुरवठा होऊ लागल्याने संघर्षाची भूमिका घेतल्यानंतर इंडस्ट्रीयल दराने विद्युतपुरवठा करण्यास सुरूवात झाली. मात्र, विद्युतपुरवठा लोडशेडींग कार्यक्रमामुळे बंद झाला, कामगारांना लोडशेडींगमुळे विनाकाम पगार करणे भाग पडले आणि सरकारी असंबंध्दतेमुळे अनेकांचे उद्योग बंद होऊन तालुक्यातील उद्योजकता लयास गेली. अलिकडेच, लॉकडाऊनमुळेही उरले सुरले उद्योजक संपुष्टात आले आहेत. ज्याप्रकारे वक्ता दशसहस्त्रेषू म्हणजेच दहा हजारात एखादा असतो तसेच उद्यमशीलता सहस्त्रेषू म्हणजेच हजारात एखादाच उद्योजक होत असल्याने उद्योजकाला संपविणे म्हणजे त्या भागातील भावी पिढीला उद्योजकतेपासून दूर करण्याचा प्रकार असल्याचे सांगून सर्व बुडीत कर्ज असलेल्या उद्योजकांना नव्याने उभारी देण्याची गरज व्यक्त केली. याप्रसंगी शेतकरी घोलप यांनीही पगारी नोकरी इन्कम टॅक्स भरणारा असल्याने मला शेती करताना असंख्य अडचणी निर्माण केल्याचे सांगून विविध योजनांपासून वंचित ठेवण्यात आल्याने शेतकरी म्हणून फार मोठे नुकसान सोसावे लागल्याची माहिती यावेळी दिली.

# आगामी निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर आढावा बैठक व पक्ष प्रवेश ; राष्ट्रवादीला खिंडार

**दै.रायगड नगरी । किशोर पितळे**

**तळा** : तळा येथे शेतकरी कामगार पक्षाचे आढावा बैठक८ऑक्टो.रोजीशाखाकार्यालयात भरविण्यात आली होती या बैठकीला रायगड जिल्हा चिटणीस तथा रायगड जिल्हा परिषद पक्ष प्रतोद अँड. आस्वाद उर्फ पप्पू शेट पाटील आढावा बैठकीत उपस्थित होते. त्यांचे उपस्थितीत पिटसई मुळगाव, पिटसईबौद्धवाडी, बोरभाटला आदिवासीवाडी, खांबवली आदिवासीवाडी, महुरे बौध्दवाडी, कुंभळेकोंड, वानस्ते, बौध्दवाडी, येथिल अनेकांनी शेतकरी कामगार पक्षामध्ये जाहीर प्रवेश केला आहे. हे राष्ट्रवादी पक्षाचे बालेकिल्ला समजला जात होते. याला सुरूंग लावला.



शेकापचे जिल्हा परिषदेत असण्याऱ्या वर्चस्व मुळे ग्रामीण भागातील विकास करीत असतो याच विश्वासाने पक्षप्रवेश केला आहे असे कर्त्यांनी सांगितले. प्रवेशकर्त्याचे जिल्हा परिषद शेकाप पक्ष प्रतोद आस्वाद (पप्पू)शेट पाटील यांनी पक्षात त्यांचे स्वागत केले. पक्ष प्रवेशाने आगामी तळा नगरपंचायत व ग्रामपंचायती निवडणूकीत शेकापला निश्चितच बळ मिळाले आहे.

यावेळी तालुका चिटणीस धनराज गायकवाड, अलिबाग पंचायत समिती सभापती प्रमोद ठाकूर खरेदी विक्री संघाचे सभापती निलेश थोरे, जिल्हा बँकेचे संचालक ज्ञानेश्वर भोईर, माजी चिटणीस दिपक रसाळ, लक्ष्मण बाबू शिंदे, खरवली उपसरपंच सकपाल, लहु चव्हाण, महंमद परदेशी, कानू विचारे, गंगाराम साळवी, मारूती आडखळे, मुकुंद धामणकर चंद्रकांत तळेकर, महादेव जगताप तसेच अनेक गावातील कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी बोलताना ते म्हणाले कि तळा तालुक्यातील जनतेचे काही प्रश्न असतील ते डिसेंबर पर्यंत पुर्ण करू तुम्ही आम्हांला मदत करा आम्ही तुम्हांला मदत करू असेही ते म्हणाले तसेच गावातील कार्यकर्त्यांनी त्याकाळी स्व. प्रभाकर पाटील यांनी केलेल्या कामाचे उल्लेख केल्यामुळे मला आनंद वाटला. यावेळी तालुका चिटणीस धनराज गायकवाड म्हणाले की तालुक्यातील जनतेने पक्षावर विश्वास ठेवून अनेकांनी पक्ष प्रवेश केला आहे. त्यामुळे पक्षाची ताकद वाढली आहे असे मनोगत व्यक्त केले.

## शिवसेनेकडून व्यावसायिकाला मदतीचा हात



**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवसेनेमुळे एका बंद पडलेला व्यावसायिकाचा उद्योगधंदा पुन्हा सुरू झाला आहे. यासाठी शिवसेना जिल्हाप्रमुख रायगड पनवेल शिरीष घरत यांनी आर्थिक सहाय्य केल्याने सदर अपंग बांधवाचा व्यवसाय पुन्हा सुरू झाला आहे. खारघर शहरातील ज्ञानेश्वर सोन-वणे दोन्ही पायाने अपंग आहेत. ते आपला अपंग स्टॉल चालवून उदर निर्वाह करत होते. परंतु मागील कोरोना काळात त्यांचा व्यवसाय बंद झाल्यामुळे त्यांचा अपंग स्टॉल मोडकळीस आला होता. त्यांनी शिवसेना जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांची भेट घेऊन, आपली व्यथा मांडली. सध्याची परिस्थिती पाहता, विलंब न लावता जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांनी त्यांचा मोडकळीस आलेला अपंग स्टॉल दुरुस्ती करण्यासाठी आर्थिक सहाय्य करून, त्यांचा बंद पडलेला व्यवसाय (रोजगार) पुनः सुरू करून दिला व शुभेच्छा दिल्या. यावेळी, महानगर समन्वयक गुरूनाथ पाटील, उपशहर प्रमुख प्रकाश गायकवाड, माजी उपशहर प्रमुख रवी धाडवे,शिवसेना उत्तर भारतीय शहर अध्यक्ष शैलेन्द्र त्रिपाठी, जेष्ठ शिवसैनिक गिरिष गुप्ता व जगन्नाथ सोनार आदि पदाधिकारी उपस्थित होते.

## शासकीय ऐवजाची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अंगणवाडीच्या पाठीमागील खिडकीचे ग्रील अज्ञात चोरट्याने संपूर्ण काढून त्याद्वारे आत प्रवेश करून पत्र्याचे पिंप, स्टीलच्या टाक्या, टोप, ग्लास, ताटे, सिलेंडर, चटई, बेबी किट, प्लॅस्टीक खुर्च्या, मुलांची खेळणी व इतर वस्तू अशा ऐवजाची चोरी झाल्याची घटना तालुक्यातील काळुंद्रे गावातील अंगणवाडी क्र.१ मध्ये घडली आहे. या ठिकाणी असलेल्या अंगणवाडीच्या पाठीमागील खिडकीचे ग्रील कोणीतरी अज्ञात चोरट्याने संपूर्णपणे काढून तेथून आत असलेल्या जवळपास ८ हजार ६०० रुपये किंमतीचा ऐवज चोरुन नेल्याची तक्रार अंगणवाडी सेविका ताई महादेव चिखलीकर यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात केली आहे.

# परळीतील डॉ. प्रभाकर गावंड विद्यालयास संगणकाची भेट

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

को.ए.सो.डॉ.प्रभाकर रामचंद्र गावंड विद्यालय ,परळी येथे कालकथीत विमलताई दिलीप तांबे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयु.दिलीप तांबे यांनी दि.(०९) शनिवार रोजी शाळेला एक संगणक भेट दिला. त्याप्रसंगी एक छोटेखानी कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता. सदर कार्यक्रम विद्यालयाचे चेअरमन ऍड् .प्रवीण कुंभार यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीचे वातावरणात पार पडला.कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून आयु.दिलीप तांबे, त्यांचे सुपुत्र आयु.प्रशांत तांबे ,सौ.माधुरी तांबे आणि कु.आर्यन तांबे उपस्थित होते.सामाजिक बांधिलकी जपत आयु .दिलीप तांबे यांनी एक अनोखा उपक्रम राबवत विद्यार्थ्यांमध्ये प्रेरणा निर्माण केली. सध्या सर्वत्र तंत्रयुक्त व संगणकीय पद्धतीचे शिक्षण सुरू आहे, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना संगणकीय ज्ञान व कौशल अवगत व्हावे, बदलत्या शिक्षण प्रक्रियेत या मुलांनी देखील शिकून मोठे व्हावे,व आपल्या तालुक्याचे जिल्ह्याचे नावलौकिक करावे अशा शुभेच्छा तांबे यांनी दिल्या. कार्यक्रम विद्यालयाचे चेअरमन आद-रणीय अॅड.प्रविणभाई कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मुख्याध्यापिका सौ.शिरसाळे.व्ही. व्ही.यांच्या अथक प्रयत्नामुळे तसेच सर्व सेवकवृंद यांच्या परिश्रमामुळे यशस्वीरीत्या संपन्न झाला. तांबे कुटुंबीयांनी दिलेल्या या भेटीबद्दल विद्यालयाच्या वतीने ऍड : प्रवीण कुंभार यांनी त्यांचे आभार मानले.

## जिल्हाधिकारी यांच्याकडून जिल्हा सामान्य रुग्णालयातील आरोग्य सोयी-सुविधांची पाहणी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी नुकतीच जिल्हा सामान्य रुग्णालयास भेट देऊन तेथे नागरिकांना देण्यात येणाऱ्या आरोग्य सोयीसुविधांची, सुरू असलेल्या कामांची पाहणी केली. त्याचबरोबर येथील नवीन इमारतीची बांधकाम पाहणी करताना त्यांनी आवश्यक त्या सूचना संबंधितांना दिल्या.

यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुहास माने यांनी जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांना जिल्हा आरोग्य यंत्रणेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध आरोग्य उपाययोजनांची सविस्तर माहिती दिली. या पाहणीदरम्यान जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी आपापसातील समन्वयाने जिल्हा सामान्य रुग्णालयातील प्रगतीपथावर असलेली कामे उत्तम दर्जाची तसेच नेमून दिलेल्या वेळेतच पूर्ण करावीत, असे निर्देश दिले. तसेच त्यांनी नागरिकांना मास्क वापरा, सोशल डिस्टंसिंगचे पालन करा, सॅनिटायझरचा वापर करा, वारंवार हात स्वच्छ धुवा, घराबाहेर अत्यावश्यक कारणांशिवाय पडू नये, कोणत्याही प्रकारचा त्रास होत असल्यास तात्काळ वैद्यकीय सल्ला घ्यावा, वय वर्ष ४५ वरील नागरिकांनी आपले लसीकरण त्वरित करून घ्यावे,असे आवाहनही केले. यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुहास माने, सार्वजनिक बांधकाम उप अभियंता श्री.देवकाते, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. गजानन गुंजकर व जिल्हा सामान्य रुग्णालयातील इतर वैद्यकीय अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

श्रीमती.माधुरी आनंद सो

वकील श्री.सत्ती एन.रेड्डी

### जाहीर नोटीस

रायगड जिल्हा न्यायाधिश-२ पनवेल यांचे न्यायालयात

नि.अ.क्र.६०३/२०१९
नि.नं.१७/ड
ने.ता.८/११/२०२१

श्री.बिनोद भैयाराम सोनार — अपिलकर्ता

विरुद्ध

श्रीमती.नर्मदा हरिश्चंद्र ठाकूर व इतर — सामनेवाला

प्रति,

१) सौ.भावना भारत माळी
पुर्वाश्रमीची नंदन हरिश्चंद्र ठाकूर
पत्ता : मंगलमय अपार्टमेंट, सेक्टर ४,
दुसरा मजला, कोपरखैरणे, नवी मुंबई — सामनेवाला क्र.५

२) मे.सैनिक कंन्स्ट्रक्शन भागीदारी संस्था
पत्ता : ९३ मर्क्युरी अपार्टमेंट, सेक्टर-६,
ऐरोली, नवी मुंबई-४००७०८ — सामनेवाला क्र.८

३) श्री.सुर्यकांत विश्वास भोयटे
मे.सैनिक कंन्स्ट्रक्शन भागीदार संस्थातर्फे भागीदार
पत्ता : ९३ मर्क्युरी अपार्टमेंट, सेक्टर-६,
ऐरोली, नवी मुंबई-४००७०८ — सामनेवाला क्र.९

४) श्री.एस.एस.अरिफ अली
मे.सैनिक कंन्स्ट्रक्शन भागीदार संस्थातर्फे भागीदार
पत्ता : ९३ मर्क्युरी अपार्टमेंट, सेक्टर-६,
ऐरोली, नवी मुंबई-४००७०८ — सामनेवाला क्र.१०

ज्याअर्थी उपरीनामीत अपीलकर्ता यांनी या न्यायालयाकडे सदरचा अपिल केला आहे आणि सदरहू अपिल तारीख ८/११/२०२१ रोजी किंवा ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याचे नंतर कोणत्याही दिवशी सुनावणीकरिता रुजू होईल हे ते समयी तुम्ही स्वतः किंवा वकीलामार्फत ह्या कोर्टात हजर होवून अपिलकर्ताचे अपिलप्रमाणे हुकूम का करू नये या विषयीचे कारण दाखवावे. सदरहू प्रमाणे हजर होवून कारण न दाखविल्यास अपिलकताचे अपिलप्रमाणे किंवा कोर्टास योग्य वाटले तो हुकूम केला जाईल.

दि.०७ माहे ऑक्टोबर सन २०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**रायगड जिल्हा न्याया.पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**रायगड जिल्हा न्याया.पनवेल**

सिडको शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

**(भूखंड वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजने अंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **करारनामा/वाटपपत्र** करणे प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | संचिका क्र. | गाव व निवाडा क्र. | सर्व्हे क्र. / हिस्सा क्र, | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहितीनुसार वाटपाशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती व सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ता.पनवेल, जि.रायगड | | | | | | | | |
| १ | १२१९ उलवे | तरघर ११७ | १२/२<br>१४/२ | ०-३-८<br>०-९-८<br>०-०-३ | ३०० चौ. मी. | भूखंड क्र. A-१९A सेक्टर-१५, क्षेत्र -९९.८८ चौ.मी. | **श्री. कान्हा हरी भोईर उर्फ किसन हरी भोईर** | निरंक |
| २ | | तरघर १६९ | ७/४ पैकी | ०-१०-५ | | | | |
| ३ | | तरघर २४५ | ७/५ पैकी<br>५३/१ पैकी | ०-५-५<br>०-४-१ | | | | |
| ४ | तळोजा-२४ | तळोजा १८ | १७७/१+२/B११<br>७२/२<br>१६६/१A<br>१६७/१B<br>१७४/० | ०-५७-३<br>०-३५-०<br>०-२०-७<br>०-०४-०<br>०-४६-० | १४५० चौ. मी. | भूखंड क्र. ०४, सेक्टर-४०, क्षेत्र १४५० चौ.मी. | **१) कै. अब्दुल कादिर म. हुसेन पटेल (मयत) व कै. अमिनाबीबी मो. हुसेन पटेल (मयत) यांचे वारस**<br>१) श्री. अब्दुल लतिफ मो. हुसेन पटेल,<br>२) श्री. अब्दुल सत्तार अ. कादीर पटेल (मयत) यांचे वारस<br>२:१) श्री. मोहमद अली अब्दुल सत्तार पटेल<br>२:२) श्री. रफीक अब्दुल सत्तार पटेल,<br>२:३) श्रीमती सुरय्या बेगम अब्दुल सत्तार पटेल<br>२:४) श्रीमती आयशाबी सोहेल जुम्मल<br>२:५) श्रीमती तबसुम एजाज मुल्ला<br>२:६) श्रीमती नजमा जावेद शेख<br>२:७) श्रीमती नहिदा आरिफ पटेल<br>२:८) श्रीमती नैमा अजाज जलगावकर<br>३) श्री. मुस्ताक अ. कादीर पटेल<br>४) श्रीमती फातीमा मो. युसुफ खामकर<br>५) श्रीमती मुमताज इब्राहिम पटेल<br>६) श्रीमती जुबेदा शब्बीर पानसरे<br>७) श्रीमती नुरजाह रौफ पटेल<br>८) श्रीमती हसीना जहीर करमुळे<br>९) श्रीमती आसमा मुस्ताक खान<br>१०) श्रीमती सईदा शाहिद खान<br>११) श्रीमती नफीसा अशफक खान उर्फ नफीसा खलील पटेल,<br>१२) श्रीमती झहिदा सलिम खामकर<br>१३) श्री. इकबाल इस्माईल पटे,<br>१४) श्री. मुनाफ इस्माईल पटेल<br>**२) कै. अब्दुल लतिफ म. हुसेन पटेल (मयत) यांचे वारस**<br>१) श्रीमती हलिमा अ. लतिफ पटेल<br>२) श्री. मनसुर अ. लतिफ पटेल<br>३) श्री. मोहसीन अ. लतिफ पटेल<br>४) फरीदा अ. लतिफ पटेल उर्फ फरीदा बशीर मुल्ला (मयत) यांचे वारस<br>४:१) श्री. सोहेब उर्फ शोएब बाशीर मुल्ला<br>४:२) सौ. नासिस नौफिर सय्यद<br>५) हमीदा अ. लतिफ पटेल उर्फ हमीदा इकबाल वरेकर<br>६) रशीदा अ. लतिफ पटेल उर्फ रशीदा झरुर पटेल | ----- |
| | | | **एकूण** | **१-६३-०** | | | | |
| नोड-काळुंद्रे | | | | | | | | |
| ४ | २०३ | काळुंद्रे १८७/२१० | १०/३D | ०-५१-० | ४५० चौ. मी. | मौजे करंजाडे, भूखंड क्र.३७, सेक्टर-५A, क्षेत्र ४५० चौ.मी. | **मूळ भुधारक कै. हरीभाऊ (हरी) दगडू म्हस्कर(मयत), कै. निर्मला पुंडलिक पाटील(मयत) कै. अनूसया हरीभाऊ म्हस्कर (मयत) यांचे वारस**<br>१) श्री. शरदचंद्र हरीभाऊ म्हस्कर<br>२) श्री. भरत हरीभाऊ म्हस्कर<br>३) श्री. श्याम हरीभाऊ म्हस्कर<br>४) सौ. सुरेखा विष्णू भुंडेरे<br>५) सौ. प्राजक्ता प्रशांत पाटील<br>६) श्री. सुरेश पुंडलिक पाटील(कुरंगले)<br>७) श्री. रमेश पुंडलिक पाटील<br>८) श्री. नंदकुमार पुंडलिक पाटील<br>९) श्री. समीर पुंडलिक पाटील<br>१०) सौ. कांचन काशिनाथ गवते<br>११) सौ. मानिक श्याम पाटील<br>१२) सौ. वैजंती विनायक शितखंडे<br>१३) सौ. विना विश्वास पारंगे<br>**कै. विलास हरीभाऊ म्हस्कर(मयत) यांचे वारस**<br>१४) बकुळा विलास म्हस्कर<br>१५) विक्रम विलास म्हस्कर<br>१६) विजेंद्र विलास म्हस्कर<br>१७) विघ्नेश विलास म्हस्कर | ----- |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा संबंधित, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसाच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. तसेच सदर हरकत aclso.thane@cidcoindia.com या ईमेल वर सादर करावे. सदर अर्जासह पूरक कागदपत्रांची तपासणी करून करारनामा करण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र.१०, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

CIN - U99999 MH 1970 SGC-014574

**www.cidco.maharashtra.gov.in**

**मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (रायगड)**

सिडको/जनसंपर्क/२४८/२०२१-२२

# संक्षिप्त...

## पुगाव जवळ टेम्पोत सापडल्या दोन मृत्यूमुखी

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

मुंबई-गोवा हायवे वरील पुगाव गावाच्या हद्दीत दत्तराम वसंत अधिकारी यांच्या चेतन टी स्टॉल जवळ अब्दुल कादीर शफीउल्ला मन्सूरी वय ३२ वर्ष रा. वसई फाटा मुल्लत नगर, जि. ठाणे यांच्या ताब्यातील आयशर टेम्पो क्र. एम एच ०२एफ जीं.१८४२यामध्ये पाळीव प्राणी /गुरे वाहून नेण्याचा परवाना नसताना गीर जातीच्या ५ गाई व तीन वासरे असे एकूण ८जनवारे पालवणी मंडणगड वसोना गुजरातकडे घेऊन जात असतांना सदर ग्रुांची योग्य ती सुरक्षा न घेतल्यामुळे आठ पैकी २ गाई मरण पावल्या असल्यामुळे टेम्पो चालक यांच्या वर कोलाड पोस्टे गु र न ०८५/२०२१ प्राण्यांना निर्दयतेने वागणूक करण्यास प्रतिबंध अधिनियम १९६० कलम ११ मो वा कायदा १९८८ कलम६६ /१९२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून, टेम्पोचालक यास ताब्यात घेण्यात आले असून,सदर टेम्पोत असलेले ६ गीर गायी पाहूर येथील डॉ भट यांच्या गोशाळेत संरक्षण कमी ताब्यात देण्यात आले आहेत व दोन मयत झालेले गायीचे पशुवउद्यकीय अधिकारी रोहा यांच्याकडून पोस्ट मारतुम करून घेण्यात येत आहे अधिक तपास सपोनि सुभाष जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सहा फौजदार ए आर सायगावकर पोहवा ए आर म्हात्रे पोहवा नरेश पाटील करीत आहेत, कोणताही कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न नाही यातील चालक याच्याकडे गुरे चेक केल्याचे पशु वैद्यकीय अधिकारी दापोली यांचे फिटनेस सर्टिफिकेट व चेक रिपोर्ट व वाहतूक परवाना होता फक्त योग्य काळजी घेतली नाही व गायीची मृत्यूस कारणीभूत झाल्याने गुन्हा दाखल करण्यात आला आहे

## भारतीय जनता पार्टी खारघर मंडलाच्या वतीने सेवा समर्पण अभियानंतर्गत अन्नदान

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सेवा व समर्पण अभियानांतर्गत भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली खारघर मंडलात विविध कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरे केले गेले. या अभियानात सेवा अभियान कार्यप्रमुख व खारघर मंडलाचे उपाध्यक्ष रमेश खडकर यांच्यावतीने ५०० नाका कामगार व गरीब वस्तीतील नागरिकांना अन्नदान करण्यात आले. यावेळी सेवा व समर्पण अभियान प्रमुख व मंडलाचे सरचिटणीस दीपक शिंदे तसेच शिवतेज मित्र मंडळाचे कमलेश मिश्रा, सुनिल गायकवाड, बबलू मेहरोलिया, सचिन केदार, प्रदीप पाटील उपस्थित होते.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जीवनावरील दोन दिवसीय प्रदर्शनाचे खारघरमध्ये आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सेवा व समर्पण अभियानाअंतर्गत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जीवनावरील प्रदर्शनीचे आयोजन खारघरमध्ये करण्यात आले आहे. लिटील वर्ल्ड मॉलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या या दोन दिवसीय प्रदर्शनीचे पनवेल महापालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या हस्ते आज (शनिवार, दि. ०९) उद्घाटन करण्यात आले. या वेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशासाठी आपले जीवन सर्मपीत केले असून, देशाच्या विकासासाठी त्यांनी केलेले कार्य मोलाचे आहेत. त्यामुळे नागरीकांनी या प्रदर्शनीमधून प्रेरणा घ्यावी असे प्रतिपादन केले.




सेवा व समर्पण अभियाना अंतर्गत भारतीय जनता पार्टी खारघर मंडळातर्फे लिटील वर्ल्ड मॉलमध्ये ९ आणि १० ऑक्टोबर दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जीवनावरील प्रदर्शनीचे आयोजन केले आहे. या प्रदर्शनाचे पनवेल महापालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन झाले तसेच या वेळी केंद्र सरकारच्या विविध योजनांचा लाभ घेत असलेल्या लाभार्थ्यांचा सन्मान प्रमाणपत्र देऊन करण्यात आला.

या वेळी पनवेल महापालिकेचे नगरसेवक अभिमन्यू पाटील, ऍड.नरेश ठाकूर, रामजी बेरा, नगरसेविका आरती नवघरे, भाजपचे खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, सरचिटणीस किर्ती नवघरे, दीपक शिंदे, भाजप युवा मोर्चा खारघर व तळोजा मंडल अध्यक्ष विनोद घरत, जिल्हा महिला मोर्चा उपाध्यक्ष संध्या शारबिद्रे, जिल्हा चिटणीस गिता चौधरी, मोना आडवाणी, विपुल चौटालीया. संजय घरत, शोभा मिश्रा, संजय बागडे, अक्षय पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.

# किनेश्वरपर्यंत पोहोचविणारा पुल कोसळला!

## एक कोटीच्या रस्त्यामुळे तापलेले राजकारण थिजले



**दै.रायगड नगरी । शैलेश पालकर**

**पोलादपूर** : तालुक्यातील आड, चांभारगणी बुद्रुक ते किनेश्वर आणि पेढावाडीपर्यंत जाणाऱ्या १ कोटीच्या रस्त्यामुळे गेल्या दीड दोन महिन्यांपासून शिवसेना आणि काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकर्त्यांच्या रस्सीखेचीच्या राजकीय पक्षांतर व प्रवेशाचे खेळ संपूर्ण पोलादपूर तालुका पाहात असताना अखेर किनेश्वरपर्यंत जाणाऱ्या रस्त्यावरील एक पुल नदीपात्रामध्ये कोसळल्याने तापलेले राजकारण आता थिजले आहे.

बुधवारी रात्री जोरदार पावसामुळे या किनेश्वरपर्यंत जाणाऱ्या रस्त्यावरील तीन पुलांपैकी एक पुल नदीपात्रामध्ये कोसळल्याने हा रस्ता वाहतुकीस बंद झाला असून नवीन पुल उभारण्यात येईपर्यंत ग्रामस्थांना आता नदीच्या उथळ पात्रातूनच अचानक उदभवणाऱ्या पुरस्थितीचा धोका पत्करून पायवाट करावी लागणार आहे.

यंदा २२ जानेवारी रोजी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत आड ते किनेश्वर रस्त्याचे भुमिपुजन पालकमंत्री ना.अदिती तटकरे यांच्याहस्ते झाल्यानंतर या भागात राजकीय अनुकूलतेचे वारे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बाजूने झाले होते. यानंतर अचानक प्रत्यक्षात या कामाला सुरूवात होण्याची लक्षणे जाणवू लागल्याने गेल्या महिन्यात शिवसेनेने किनेश्वरवाडीचा पक्षप्रवेश करून घेत या गावातील पक्षाच्या फलकावर शिवसेना नाव लिहिण्याची भाषाही केली. यानंतर प्रवेशकर्ते काँग्रेस पक्षातून शिवसेनेमध्ये प्रवेश करीत असल्याचे अनेक वक्त्यांच्या भाषणातून सांगण्यात आले तरीही ते सर्व प्रवेशकर्ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून शिवसेनेमध्ये प्रवेश करणारे होते, असा खुलासा काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अजय सलागरे यांनी वृत्तपत्रांतून केला. त्याच दिवशी पोलादपूर शहरामध्ये खासदार सुनील तटकरे यांनी किनेश्वर शिववाडीतील उरल्या सुरल्या काँग्रेसजनांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश घेतला. कथित काँग्रेस कार्यकर्त्यांच्या प्रवेशाचे राजकारण तापले असताना आता हा किनेश्वर रस्त्यावरील पुल कोसळल्याने आड ते किनेश्वर रस्त्यासोबत सुरू झालेले शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यातील सामंजस्याचा पुल किती मजबूत राहिल, याचा नजिकच्या काळात प्रत्यय येण्याची शक्यता आहे. बुधवारी रात्री हा पुल कोसळल्याने पोलादपूर तहसिल कार्यालयातील मंडलअधिकारी सिनकर आणि तलाठी फुलवर यांनी अहवाल तयार करून तहसिल कार्यालयाला सादर केला आहे.

# मोर्बा वीजवितरण कंपनीवर रिक्षा संघटनेचा मोर्चा

**दै.रायगड नगरी । पद्माकर उभारे**

**माणगाव** : मोर्बा येथील तंटामुक्त अध्यक्ष यांच्या अधिपत्याखाली शनिवार दिनांक ९ ऑक्टोबर रोजी वीजवितरण कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. यावेळेस मोर्बा गावचे तंटामुक्त अध्यक्ष निजाम फोपलुणकर यांच्या समवेत असलेले रिक्षा संघटनेचे पदाधिकारी व बहुसंख्य सभासद आणि नागरिक यांचे मार्फत मोर्बा शाखेचे अंभियता विजेंद्र मानकर तसेच वीजवितरण कंपनीचे अधिकारी जगताप व सातपुते यांना निवेदन देण्यात आले.

या निवेदनामध्ये चालक मालक रिक्षा संघटना यांच्याद्वारे वीज मीटर घराच्या बाहेर काढण्यासाठी आमची परवानगी आहे परंतु मीटरला एमसील लावले जाते त्याला आमचा विरोध आहे. मोर्बा गावामध्ये भविष्यात मीटर बंद किंवा मीटरमध्ये बिघाड झाल्यास किंवा सर्व्हिस वायर बदलायची झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी मोर्बा वीजवितरण कंपनीवर असेल असे निवेदनात म्हटले आहे.

याबाबत मोर्बा शाखेचे अभियंता विजेंद्र मानकर यांना रिक्षा संघनेच्या वतीने विचारले असता आम्ही आपल्या कंपनीकडून तुमच्या आलेल्या निवेदनाचा योग्य तो पाठपूरवठा करून सर्व प्रकारे सहकार्य करू तसेच मोर्बा शाखेच्या अंर्तगत ग्राहकांकडे असलेल्या ८० लाख वसूलीपैकी ५० लाख रुपये ही वसूली करण्यात आली. तसेच मोर्बा शाखेअंतर्गत असणाऱ्या वीज चोरी करणाऱ्या ग्राहकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. असे मोर्बा शाखेचे सहाय्यक अभियंता मानकर यांनी ग्राहकांसमोर बोलताना सांगितले. शेवटी चालक मालक रिक्षा संघटना मोर्बा यांनी केलेल्या मागण्या यांचे पत्र आमच्या वरिष्ठांना देवून व त्याच्या मागण्या परिपूर्ण करू त्याना सहकार्य करू तसेच ज्यांचे वीज मीटर फॉल्टी आहेत त्याचे मीटर लवकरात लवकर बदलून देऊन असे आश्वासन ग्राहकांना शेवटी बोलताना दिले.यावेळेस मोर्बा येथील रिक्षा संघटनेचे प्रमुख निजामुदीन फोपलूणकर ,हुसेन राऊत,महेद्र खांबे, तसेच रिक्षा संघटनेचे पदाधिकारी व सभासद यावेळी मोठ्या उपस्थित होते.



# विशेष लसीकरण मोहीम मिशन कवच कुंडले यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे : तहसिलदार कनशेट्टी

**दै.रायगड नगरी । तळा**

देशात कोविड १९ संभाव्य तिसऱ्या लाटेची तीव्रता कमी करण्यासाठी रायगड जिल्ह्यात ८ ऑक्टो ते १४ ऑक्टो २०२१ या कालावधीत विशेष लसीकरण मोहीम प्रत्येक गावात राबविण्यात येत असून तालुका कोरोना मुक्त करण्यासाठी सर्वांनी मिळून सहकार्य करावे हे आपल्या भल्यासाठी असून आरोग्य प्रशासनाला विशेष सहकार्य करावे. असे तहसीलदार ए.एम.कनशेट्टी यांनी केले आहे.



तालुक्यातील १८ वर्षावरील लाभार्थी लोकसंख्या २२२८५ असून १६८६६ नागरिकांनी प्रथम डोस घेतला उर्वरीत ५४१९ लाभार्थींनी लसीकरण करूनघेण्यासाठी प्रत्येक गावात लसीकरण मोहीम राबविण्यात येत असून स्तनदा महीला, दिव्यांग व्यक्ती वयोवृद्ध यांना देखील देण्यात येणार आहे. तालुक्यातील तळा उप केंद्र मांदाड, महागांव परिसरातील सर्व वाड्या वस्तीतील सर्वांनी लसीकरण करून घेऊन संभाव्य तिसऱ्या लाटेची तिव्रता रोखण्यास मदत होणार आहे. शासनाच्या आरोग्य विभागाने मिशन कवच कुंडले मोहीम यशस्वी करण्यासाठी तालुक्यातील सरंपच, आशा सेविका, अंगणवाडी सेविका, मदतनीस, तलाठी, ग्रामसेवक, आशा गट प्रवर्तक, आरोग्य विभागातील कर्मचारी, पोलीस प्रशासन एकात्मिक बालविकास प्रकल्प विभाग शिक्षक तैनात करण्यात आले आहेत. महिलासाठी नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने विशेष मोहीम राबविण्यात येत असून प्रत्येक गावात स्वतंत्र नियोजन करण्यात येईल. पहिला डोस पुर्ण झाल्यानंतर दुसरा डोस प्रलंबित असलेल्यांना लाभ मिळणार आहे. लसीची कमतरता नसून सर्वांनी लसीकरण करून घ्यावे असे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गोरेगांवकर यांनी आवाहन केले आहे.

# मोफत थायरॉइड चेकअप शिबिराचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

७ ऑक्टोबर पासून पुढील नऊ दिवस जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्था, शेतकरी कामगार पक्ष आणि दीपक क्लिनिकल लॅबोरेटरी यांच्या माध्यमातून सर्व माता भगिनी यांच्या आरोग्याच्या दृष्टीने पुढील नऊ दिवस मोफत थायरॉइड चेकअप शिबिराचे शुभारंभ करण्यात आले.

याप्रसंगी आपल्या सर्वांसाठी स्वच्छता दूत म्हणून सेवा देणाऱ्या आपल्या भगिनींची थायरॉईड तपासणी करून सौ.ममता प्रितम म्हात्रे यांच्या उपस्थितीत शिबिराची सुरुवात झाली. याप्रसंगी नगरसेविका सौ. प्रज्योती म्हात्रे, सौ.राजश्री शेळके , सौ हेमलता दीपक कुदळे मान्यवर उपस्थित होत्या. या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यानी केले आहे.



# मतदार साक्षरता आणि निवडणुकीत सहभाग मोहिमेस सुरूवात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका निवडणुक विभागाच्यावतीने स्वीप अर्थात पध्दतशीर मतदार साक्षरता आणि निवडणुकीत सहभाग मोहिमेस सुरूवात झाली. या माहिमेअंतर्गत पालिका क्षेत्रातील सर्व नागरिकांनी तसेच १८ वर्ष पूर्ण झालेल्या नव युवकांनी स्वतःचे नाव मतदार यादीत नोंदणी करावी, तसेच पद्धशीरपणे नव मतदारनोंदणी आणि निवडणुकीत नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढावा म्हणून परिसरात जनजागृती करण्यासाठी विविध कार्यक्रम,चर्चासत्र व सामाजिक संदेश देणाऱ्या स्पर्धांचे आयोजन केले आहे.

पनवेल महानगरपालिकेच्या प्रभागनिहाय गृह निर्माण सोसायट्याचे अध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष व सक्रिय सभासदांनी एकत्र येऊन गृह निर्माण सोसायटीच्या आवारात एक दिवसीय मतदार नोंदणी कॅम्पचेआयोजन करावे. त्याचबरोबर सोसायटीच्या प्रत्येक घरा-घरामध्ये जाऊन पदाधिकाऱ्यांनी जनजागृती करून जास्तीत जास्त मतदार नोंदणी करावी. तसेच सक्रिय स्वयंसेवी संस्था व सेवाभावी संस्थेच्या आवारात किंवा जवळच्या परिसरात जनजागृती करून नव युवकांची नावे मतदार यादीत नोंदणी करावी. बचतगट, व्यवसायिक, उद्योजक ऑनलाईन चर्चासत्र व ओळख परेडचे आयोजन केले जाणार आहे. व्यवसायिकांनी 'साक्षर मतदार कसा असावा' याविषयावर व्हिडिओ बनवून स्वतःच्या व्यवसायाची माहिती किंवा जाहिरात करावी असे आवाहन उपायुक्त विठ्ठल डाके यांनी केले आहे. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील शालेय/ कॉलेज विद्यार्थी, हौशी आणि व्यवसायिक कलाकारांना वाव देण्यासाठी पथनाट्य स्पर्धेचे आयोजन केले आहे. सर्व हौशी आणि व्यवसायिक कलाकारांनी वरील विषयानुसार विविध जिंगल्स - ऑडिओ , रिल्स-व्हिडिओ बनवून जास्तीत जास्त स्पर्धकांनी सहभाग घ्यावा. ही स्पर्धा सर्वांसाठी खुली राहील. याचबरोबर उत्साही एनसीसी, एनएसएस, एनवाययूएस महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा गट तयार करून पनवेल महानगरपालिका मुख्यालय भेट आयोजन करून विस्तृतपणे माहिती दिली जाणार आहे.

# मुरुड तालुक्यातील राजपुरी येथील जंजिरा पर्यटन सहकारी संस्थेतर्फे जंजिरा किल्ल्यात स्वछता मोहीम

**दै.रायगड नगरी । मुरुड**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गेली १८ महिने पर्यटकांसाठी बंद असलेला मुरुड तालुक्यातील राजपुरी येथील जंजिरा किल्ल्याचा दरवाजा अजूनही उघडलेला नाही, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग हे जलदुर्ग पर्यटकांसाठी खुले असल्याने जंजिराही आपणास पाहण्यास मिळेल या अपेक्षेने आलेल्या पर्यटकांची घोर निराशा होत आहे. त्यामुळे तेथील बोटधारक आलेल्या पर्यटकांना बाहेरूनच किल्ल्याला फेरी मारून आणत आहेत. सध्या किल्ल्यामध्ये पुरातत्व खात्याकडून पर्यटकांसाठी साफसफाईचे काम सुरु आहे परंतु २२ एकर मध्ये पसरलेल्या किल्ल्याची साफसफाई करण्यासाठी कर्मचारी अपुरे आहेत त्यामुळे किल्ला लवकरात लवकर सुरु व्हावा यासाठी राजपुरी येथील जंजिरा पर्यटन सहकारी संस्थेच्या वीस सदस्यांनी स्वछता मोहीम हाती घेतली आहे. किल्ल्याबाहेरील स्टॉलधारक, हॉटेल व्यावसायिक, गाईड यांचीही अवस्था बिकट झाली आहे त्यामुळे किल्ला पर्यटकांसाठी त्वरित सुरु करावा यासाठी आम्ही स्वच्छता मोहीम हाती घेतल्याचे व शासनाकडून किल्ला शनिवार दि. ९ ऑक्टोबर पासून सुरळीत कोरोनाबाबतचे नियम अटी पाळून सुरु केली आहे.

# आंतरराष्ट्रीय बालिका दिनानिमित्त रोहे तालुक्यात चित्रकला स्पर्धेचे आयोजन

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

भारतभर जागरूकता अभियान व पोहोच कार्यक्रमातंर्गत आंतरराष्ट्रीय बालिका दिनानिमित्त दि.११ ऑॅक्टो. रोजी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली आहे.

भारतभर जागरूकता अभियान व पोहोच कार्यक्रमातंर्गत राष्ट्रीय विधी प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय नवी दिल्ली तसेच महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार व दिवाणी न्यायाधीश क स्तर रोहा तथा अध्यक्ष तालुका विधी सेवा समिती रोहा यांच्या वतीने दि.२ ऑॅक्टो. ते १४ ऑॅक्टो.या कालावधीत सदरील अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने अधिकार क्षेत्रातील रोहे तालुक्यातील कोएसो मेंहेंदळे हाय. रोहा,द.ग.तटकरे माध्य.विद्या.कोलाड, गु.रा. अग्रवाल हाय.नागोठणे व न्यू इंग्लिश स्कूल चणेरा या चार केंद्रावर इ.५ वी ते ७ वी व इ.८ वी ते १० वी या गटातील विद्यार्थ्यांकरिता आंतरराष्ट्रीय बालिका दिनानिमित्त चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेसाठी १. बालकामगार प्रतिबंध, २.बेटी बचाओ-बेटी पढाओ, ३.बालकांचे अधिकार, ४ स्त्री भ्रूण हत्या व ५.पर्यावरण संरक्षण आदी विषय ठेवण्यात आले आहेत. तर प्रत्येक गटातील सर्वोत्कृष्ट तीन चित्रांना पारितोषिके व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत. तर याच कार्यक्रमाचा एक भाग म्हणून ११ ऑॅक्टो. रोजी स.९ वा.कोएसो मेंहेंदळे हाय. ते रोहा-अष्टमी नगर परिषदेपर्यंत विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळींच्या उपस्थितीत बेटी बचाओ-बेटी पढाओ या संकल्पनेवर विद्यार्थ्यांच्या रॅलीचेही आयोजन करण्यात आले आहे.